# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६
## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे**

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री. हारुन खान, मोहन मते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे येथील शासकीय ससून रुग्णालयातून १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या पॉक्सो (POCSO) या गंभीर गुन्ह्यात अटकेत असलेल्या एका आरोपीने एमआयसीयू वार्डच्या बाथरूमची काच तोडून पलायन केल्याची घटना दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी उघडकीस आली असणे, एमआयसीयू हा अतिसंवेदनशील विभाग असताना आरोपी पलायनाच्या वेळी तेथे तैनात पोलीस बंदोबस्त, सुरक्षा रक्षक व सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत नसल्यामुळे ही चूक घडल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, ससून रुग्णालयातून यापूर्वीही ड्रग्ज प्रकरण, मर्डर प्रकरण व इतर विविध गुन्ह्यातील आरोपींनी पलायन केल्याच्या पार्श्वभूमीवर ससून रुग्णालय हे आरोपींसाठी ‘सेफ पॅसेज’ ठरत असल्याची बाब समोर येणे, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून पॉक्सो ( POCSO ) सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीच्या पलायनास जबाबदार असलेल्या पोलीस व रुग्णालय प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ससूनसह राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये आरोपी रुग्णांसाठी स्वतंत्र उच्च सुरक्षा व्यवस्था लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) सर्वश्री. काशिनाथ दाते, सुनिल प्रभू, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. अमिन पटेल, अस्लम शेख, साजिद खान पठाण, संजय मेश्राम, मुरजी पटेल, संजय केळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीवरून कळवा येथे बारावीचा पहिलाच पेपर देण्यासाठी जात असताना मुंब्रा-कळवा स्टेशन दरम्यान गर्दीमुळे लोकलमधून पडून सोहम कटरे या विद्यार्थ्याचा दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडलेली असणे, मुंबईत उपनगरीय रेल्वेत गर्दीमुळे झालेल्या वादात एका

शिक्षकाची हत्या झाल्याची घटना ताजी असतानाच, कुर्ला रेल्वे स्थानकात सीएसएमटी टर्मिनसच्या दिशेने जाणाऱ्या धीम्या लोकलमधुन शीव स्थानकाजवळ गर्दीच्या रेट्यामुळे सचिन विश्वकर्मा यांचेसह तीन प्रवासी रुळावर पडल्याची घटना दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी घडणे, तीघांपैकी अफझल चौधरी यांची प्रकृती चिंताजनक असणे तर उर्वरित दोघेजण जखमी होणे, मुंबईकरांची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी उपनगरीय लोकल अनेकांसाठी रोजचा जीवघेणा प्रवास ठरत असून वेळेची घाई, उशिराने धावणाऱ्या गाडया, क्षमतेपेक्षा जास्त गर्दी आणि अपुऱ्या सुविधांमुळे लोकल प्रवास कायमचाच धोकादायक ठरणे, सन २०२५ सालामध्ये मुंबई उपनगर रेल्वेवर ४८४१ अपघात घडलेले असून यामध्ये २८७ प्रवाशांचा मृत्यू झालेला असणे तर २२५४ प्रवासी जखमी झाल्याचे निदर्शनास येणे, अधिकृत आकडेवारीनुसार दररोज सरासरी १३ प्रवासी लोकल अपघाताचा बळी ठरत असणे, मुंबई उपनगरी रेल्वे गाड्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र राखीव डबा असावा म्हणून पालकांकडून व विद्यार्थ्यांकडून रेल्वे प्रशासनाला वारंवार निवेदन दिलेली असणे, अपघात टाळण्यासाठी तसेच वाढत्या गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी स्वयंचलित दरवाजे बसविणे व कार्यालयीन वेळेत बदल करण्याबाबत सभागृहात अनेक वेळा चर्चा होऊनही यावर ठोस उपाययोजना करण्याबाबत अद्याप शासनाकडून कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सर्वसामान्य प्रवासी जनता मृत्युमुखी पडणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(३) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरामध्ये वाढत्या लोकसंख्येच्या व रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर आयसीयू बेडची उपलब्धता अपुरी असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, शासकीय व खासगी रुग्णालयांमधील विद्यमान आयसीयू क्षमतेच्या तुलनेत गंभीर रुग्णांची संख्या अधिक असल्याने उपचारांसाठी प्रतीक्षा करावी लागण्याची स्थिती निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले असणे, सदर परिस्थितीमुळे आपत्कालीन उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना तातडीने आयसीयू सेवा उपलब्ध होण्यात अडथळे निर्माण होत असून रुग्णांच्या नातेवाईकांना विविध रुग्णालयांमध्ये आयसीयू सेवा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावे लागणे, परिणामी आरोग्य व्यवस्थेवर अतिरिक्त ताण येत असून नागरिकांमध्ये अस्वस्थता व असुरक्षिततेची भावना निर्माण होत असणे, वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची क्षमता वाढवून शासकीय रुग्णालयांमध्ये आयसीयू बेडची संख्या वाढविण्याची आवश्यकता, अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच आवश्यक मनुष्यबळ व वैद्यकीय उपकरणांची पूर्तता करण्याची आवश्यकता, सदरहू बाब विचारात घेऊन नागरिकांना वेळेवर व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनस्तरावर आवश्यक नियोजनात्मक व प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (मुख्यमंत्र्यांचे उत्तर)**

**पाच : मा. मुख्यमंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**सहा : सन २०२५-२०२६ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस)**

(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(२) नियोजन विभाग

(३) सार्वजनिक आरोग्य विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सात : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(अ) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ - महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२५**

---

**(ब) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६**

**आठ : (बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके,**

**सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सामंत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri **२०२६**' ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध

योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

नऊ : **सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी

राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ८)**

**(१) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील बोरिवली (पूर्व), संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेतील २५,१४४ आदिवासी व अतिक्रमित झोपडीधारकांचे पुनर्वसन करुन अतिक्रमणे निष्कासित करण्याचे दि. ७-५-१९९७ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतानाही अद्याप याबाबत २८ वर्षे इतका कालावधी होऊनही २५,१४४ पैकी १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सदरहू झोपडीधारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत अवस्थेत असणे, एकूण पात्र झोपडीधारकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएस क्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेतील रु. ७०००/- शुल्क भरलेल्या पात्र झोपडीधारकांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, शासनाचे वन विभागाचे व एसआरए प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसनासाठी निश्चित केलेली आरे वसाहतीतील वन क्षेत्राची ९० एकर जागा ही संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने दि. ५-१२-२०१६ रोजी शासन निर्णय जारी केला असल्याची माहिती लपवून सदरहू ९० एकर जागेत झोपडीधारकांचे एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचा धक्कादायक निर्णय घेणे, संजय गांधी उद्यान हे मुंबईचे ऑक्सीजन स्त्रोत असून ते अतिक्रमण मुक्त करण्यास २८ वर्षे कालावाधी पूर्ण होऊनही ठोस कृती न झाल्याने शासनावर गंभीर ताशेरे ओढून उद्यान अतिक्रमण मुक्त करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दि. १४-१-२०२५ रोजी शासनास आदेश देणे, त्यानुसार शासनाने उर्वरित १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी कृती आराखडा तयार करुन तातडीने

कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदाफाटा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथे असलेल्या अल्ट्राटेक, माणिकगड सिमेंट कंपनीव्दारे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याची तक्रार नागरिकांनी शासनाकडे वारंवार करणे, सदर कंपनीच्या परिसरामध्ये प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या मशिनरी अकार्यक्षम असणे, प्रदूषण कमी करण्याबाबत या भागातील नागरिकांनी आंदोलने, मोर्चे काढून आपली तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा कोणतीही कारवाई न होणे, कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाने पर्यावरण प्रदूषण विषयक प्रकरणे पूर्णपणे दाबली जात असल्याची बाब समोर येणे, कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांना क्षयरोग, कर्करोग, श्वसनाचे रोग, चर्मरोग सारखे आजार झाले असल्याची बाब समोर येणे, या कारखान्यातून निघणारे सांडपाणी उघड्या मार्गाव्दारे विविध नदी व नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या समोर येणे, सदर कारखान्याच्या प्रदूषणाला दरवर्षी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाकडून प्रदूषण होत नसल्याची क्लिनचीट मिळत असणे, सदरहू बाब गंभीर असल्याने या कारखान्यांवर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **डॉ. नितीन राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळयात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाडयांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळयात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. महेश शिंदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात खाद्य उद्योगांमध्ये पदार्थाचे आकर्षण ग्राहकांला होण्याकरिता वेगवेगळे खाद्य रंग वापरले जात असणे, नैसर्गिक रंग वनस्पती, प्राणि आणि खनिजांमधून मिळविले जात असणे, कृत्रिम रंग रासायनिक प्रक्रियेव्दारे तयार करण्यात येणे, सदरहू

खाद्यरंग हे आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांना आयएस मानांकन दिले जात असणे, रासायनिक रंगामुळे खाद्यपदार्थाचे आकर्षण वाढविण्यासाठी सिंथेटिक पदार्थाचा वापर करण्यात आल्यामुळे ते मानवाच्या आरोग्यास अपायकारक असणे, यातील कित्येक रंगामुळे कॅन्सर व अन्य रोग उद्‌भवत असल्यामुळे मानवी आरोग्यास अपायकारक असणे, त्यामुळे अन्य देशांत असे रंग वापरण्यास बंदी घातलेली असतांना देखील आपल्या देशात सर्रासपणे त्याचा वापर होत असणे, नैसर्गिक रंगाचा वापर खाद्यपदार्थांमध्ये करण्याची आवश्यकता, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असणे, या संदर्भात केंद्र शासनाचा आयएस स्टँडर्डचे मानांकन बदलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने खाद्यपदार्थामध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्य रंगाचे टॉक्सिक स्टडी करुन त्यांच्या मानांकनामध्ये बदल करण्याबाबत कायदा करण्याची आवश्यकता, निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन उर्जा स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी क्वांटम फिजिक्स आणि बायोलॉजिकल अप्लाईड सायन्सचा वापर करुन औद्योगिक क्षेत्रामध्ये लॅब आणि त्यावरती संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना इन्फ्रास्टक्चर उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दि. १८/०५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात येणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात येणे, परंतू सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी न होणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पनधारक असल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करुन निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण/अभयारण्य परिक्षेत्रातील गावांचे पुनर्वसन सन १९७८ ते २००० या कालावधीत सांगली, कोल्हापूर या ठिकाणी करण्यात येऊनही प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही नागरी सोयी सुविधा उपलब्ध न केल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणाच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाण जमीन देण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात येणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना त्यांच्या मूळ गावातील घरांची आणि जमिनींची नुकसान भरपाई देऊन सरकारने जमीन व घरांचे संपादन

करुन नुकसान भरपाई पोटी देण्यात आलेल्या रक्कमेतून शासनाने प्रकल्पग्रस्तांची मूळ जमीन संपादन करताना ६५ टक्के रक्कम कापून घेण्याबरोबरच पुनर्वसनासाठी पात्र होण्यासाठीची पुनर्वसन कायद्याची ११ ते १४ कलमे लागू करावी लागतात ती केलेली नसणे, प्रकल्पग्रस्त पुनर्वसनासाठी पात्रच होऊ न शकणे, प्रकल्पग्रस्तांनी वारंवार मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, वने मंत्री तसेच लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी कार्यालय व उप वन संरक्षक यांच्याकडे निवदने, आंदोलने करुन सुध्दा त्यांना अद्यापी न्याय मिळालेला नसणे, उपरोक्त गंभीर प्रकारामुळे चांदोली धरणग्रस्त/अभयारण्य प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती प्रचंड नाराजी व असंतोषाची भावना निर्माण होणे, या गंभीर प्रकरणी चौकशी करुन, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायदयातील कलम ११ ते १४ लागू करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देऊन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन, मोबदला व सर्व सोयी सुविधांची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मानवी स्वास्थ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असणे, अश्या स्थितीत समाजाला स्वास्थपूर्ण व समृध्द बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नसणे, वैश्विक स्तरावर देखील उत्तम शारिरीक स्वास्थ्याचा पर्याय म्हणून योगास मान्यता मिळणे, योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ वृत्तीने निरंतर कार्य करीत असणे, गुजरात, हरीयाणा, राजस्थान या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र योग शिक्षक संघ या संघटनेने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा या प्रमुख मागणीसह इतर काही महत्वपूर्ण मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, सदर मागण्यांची तातडीने पूर्तता होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. विनोद निकोले, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी अद्यापही सुटलेली नसणे, सुमारे ५५४ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करुन बांधलेल्या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होणे, मुंबईकडील मार्गिकेचे काम अद्यापही धिम्या गतीने सुरू असल्याने नव्याने तयार केलेल्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात खड्डे होणे, अनेक ठिकाणी कॉंक्रिटीकरणाचे काम करताना जुन्या डांबरी रस्त्यावर थेट सिमेंट कॉंक्रीट केल्यामुळे अनेक रस्ते तथा उड्डाण पुलांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचणे, मोठ्या वाहनांच्या अडथळयांमुळे रुग्णवाहिका, प्रवासी आणि माल वाहतूक ही तासंतास अडकून राहणे, डहाणू तालुक्यातील विवळवेडे, मॅढवण येथील उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहतूक ठप्प होण्याची शक्यता निर्माण होणे, वाहतूक नियोजनासाठी कंत्राटदारांकडून कोणतीच उपाययोजना केली गेलेली नसल्यामुळे वारंवार अपघाताचे प्रमाण वाढत असणे, गुजरात व मुंबईकडील दोन्ही मार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी लोकप्रतिनीधी व जिल्हाधिकारी यांनी वारंवार बैठका

घेऊन देखील कोणतीच उपाययोजना न होणे, निकृष्ट रस्त्यामुळे दिनांक ३१ मे, २०२५ रोजी मॅढवन-खिंडवर झालेल्या अपघातामध्ये तीन निरपराध लोकांचा झालेला मृत्यू, रस्त्याचे काम निकृष्ट करणाऱ्या कंत्राटदारावर व सदर कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा तास चर्चेची सूचना क्रमांक ९)**

**(९) श्री. राहूल कुल, वि.स.स.**

"दौंड (जि.पुणे) तालुक्यातील श्री शंभो महादेव देवस्थान, राहु व श्री भानोबा मंदिर देवस्थान कुसेगाव यांना "ब" वर्ग देवस्थानाचा दर्जा मिळणेबाबत" या विषयावरील श्री.राहूल कुल, वि.स.स. यांचा दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ११३२० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना क्रमांक १० व ११)**

**(१०) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"शासन आदेश दिनांक १९ मे, २०२५ नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत एका गावांतर्गत एका वेळी केवळ एकाच शेत रस्त्याचे काम करता येत असणे, शेत रस्त्याची कामे शक्यतो उन्हाळ्यात करावी लागत असणे, त्यामुळे गावातील इतर क्षेत्र रस्त्यांची कामे करण्यास पुरेसा कालावधी उपलब्ध होत नसणे, शेत रस्त्याच्या कामावरील मजुरांची ऑनलाइन हजेरी घेताना शेतात नेटवर्क कमजोर (वीक) असल्याने तांत्रिक समस्या येत असणे,ग्राम रोजगार सेवकांना उद्भवणाऱ्या तांत्रिक/ ऑनलाइन समस्या सोडवता याव्यात यासाठी त्यांना वेळोवेळी होणाऱ्या बदलाचे प्रशिक्षण देणे गरजेचे असणे, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामरोजगार सेवकांना दरमहा ८००० रुपये मानधन देण्यास मान्यता देणे, मात्र अद्याप या बाबीची अंमलबजावणी होत नसल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) श्री. अनिल पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"जळगाव शहरातील ऑप्टिकल दुकानांमध्ये नागरिकांच्या डोळ्यांच्या वैद्यकीय उपचाराची पध्दत अत्यंत क्रूर आणि संतापजनक असणे, चष्म्याच्या व्यवसायाचे रूपांतर एका अनियंत्रित 'बाजारात' झाले असून केवळ व्यावसायिक फायद्यासाठी

तांत्रिक ज्ञान नसलेले लोक नेत्ररोग तज्ज्ञ बनून वावरत असणे, या सदोष तपासणीमुळे समाजात नेत्रविकारांचे प्रमाण वाढून नागरिकांना शारीरिक व मानसिक मनस्ताप सहन करावा लागत असणे, या प्रकरणात आरोग्य विभाग आणि अन्न व औषध प्रशासकीय यंत्रणेने कमालीचा निष्काळजीपणा आणि दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येणे, विनापरवाना डोळे तपासणी करणाऱ्या दुकानांवर अंकुश ठेवण्यात ही यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरलेली असणे, शासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन तात्काळ अशा अनधिकृत केंद्रांची चौकशी करून ती बंद करावीत आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी नागरीकांकडून होत असेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"बल्लारपूर शहर हे ऐतिहासिक, सांस्कृतिक तसेच वनसंपदा दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून, विशेषतः उच्च दर्जाच्या सागवानी लाकडासाठी संपूर्ण देशात सुप्रसिध्द असणे, पौराणिक मान्यतेनुसार प्रभू श्रीरामचंद्रांचे आजोळ बल्लारपूर येथे असल्याचे उल्लेख आढळणे, प्रभू श्रीरामचंद्राच्या मंदिरासाठी वापरण्यात आलेले अतिशय मौल्यवान सागवान लाकूड बल्लारपूर परिसरातूनच पुरविण्यात येणे, सन १९५८ मध्ये बल्लारपूर येथे कोसळलेल्या एका भव्य व दुर्मिळ सागवान वृक्षाचा बुंधा आजही जतन करून ठेवण्यात आलेला असून, त्या वृक्षास तत्कालीन काळात "राम-लक्ष्मण" असे नाव देण्यात येणे, या ऐतिहासिक वारशाच्या स्मरणार्थ बल्लारपूर येथे सध्या एक लघु वुड म्युझियम अस्तित्वात असणे तसेच बल्लारपूर टिंबर डेपो हा आशिया खंडातील सागवानाचा सर्वात मोठा टिंबर डेपो म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखला जात असणे, वरील ऐतिहासिक, औद्योगिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेता, बल्लारपूर टिंबर डेपो येथे महाराष्ट्रातील सर्वप्रथम व एकमेव असे "टिंबर म्युझियम व झायलरियम स्थापन" करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.